बुधवार दि. १० जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २७९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# गांधी चमन ते स्टेशन रोडवरील जुने विद्युत खांब हटवा!

## अपघाताचा धोका वाढला; शिवसेनेचे दिनकर घेवंदे यांचे महानगरपालिकेला निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील गांधी चमन ते रेल्वे स्टेशन रोड परिसरात अनेक वर्षांपासून उभे असलेले जुने व धोकादायक विद्युत खांब नागरिकांच्या सुरक्षेसाठी गंभीर धोका निर्माण करत असल्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या खांबांमुळे अपघात होण्याची शक्यता वाढली असून, संबंधित विभागाने तातडीने कारवाई करून हे खांब हटवावेत, अशी मागणी शिवसेनेचे जालना विधानसभा अध्यक्ष तथा विधानसभा क्षेत्र प्रमुख दिनकर घेवंदे यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.



शहराच्या मध्यवर्ती भागातील गंभीर समस्या गांधी चमन ते रेल्वे स्टेशन हा जालना शहरातील अत्यंत वर्दळीचा आणि महत्त्वाचा मार्ग मानला जातो. या मार्गावर दिवसभर नागरिक, प्रवासी, व्यापारी, विद्यार्थी तसेच विविध प्रकारच्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. अशा परिस्थितीत रस्त्याच्या कडेला उभे असलेले जुने विद्युत खांब वाहतुकीस अडथळा ठरत असून अपघाताचा धोका वाढवत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, या मार्गावर रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असल्याने वाहतुकीचा ताण कायम असतो. त्यामुळे रस्त्यालगत उभ्या असलेल्या या खांबांमुळे वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**यापूर्वीही अपघात; जीवितहानीचा दावा**

दिनकर घेवंदे यांनी दिलेल्या निवेदनात या खांबांमुळे यापूर्वी अनेक अपघात घडल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. काही वाहनचालकांनी नियंत्रण गमावून या खांबांना धडक दिल्याच्या घटना घडल्या असून, अशा अपघातांमध्ये तीन ते चार जणांना जीव गमवावा लागल्याचा दावा करण्यात आला आहे.

या घटनांनंतरही संबंधित विभागाकडून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. आणखी एखादी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी स्थानिकांकडूनही होत आहे.

**रेल्वे स्टेशन परिसरातील वाहतुकीवर परिणाम**

रेल्वे स्टेशन परिसर हा शहराचा प्रमुख प्रवेशद्वार मानला जातो. दररोज हजारो नागरिक, प्रवासी आणि बाहेरगावाहून येणारे लोक या परिसरातून प्रवास करतात.

विद्युत खांबांमुळे रस्त्याची रुंदी कमी झाल्याचे चित्र असून त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

परिसरातील व्यापाऱ्यांनाही या परिस्थितीचा फटका बसत असून, ग्राहकांना ये-जा करताना अडचणी निर्माण होत असल्याचे सांगितले जात आहे. तसेच शहराच्या सुशोभीकरणाच्या दृष्टीनेही हे जुने खांब अडथळा ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**आरोग्य आणि पर्यावरणाचा प्रश्न**

रस्त्यालगत टाकल्या जाणाऱ्या जैविक कचऱ्यामुळे संसर्गजन्य रोगांचा धोका वाढू शकतो, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. दुर्गंधीमुळे परिसरातील रहिवासी, व्यापारी आणि प्रवाशांना त्रास सहन करावा लागत असून महानगरपालिकेने नियमित तपासणी करून संबंधित व्यावसायिकांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**तातडीच्या कारवाईची मागणी**

शिवसेनेच्या वतीने महानगरपालिकेला देण्यात आलेल्या निवेदनात गांधी चमन ते रेल्वे स्टेशन मार्गावरील धोकादायक विद्युत खांब तातडीने हटविणे, वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे तसेच मटन आणि चिकन विक्रेत्यांकडून होणाऱ्या अस्वच्छतेवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**नागरिकांचे लक्ष प्रशासनाच्या भूमिकेकडे**

जालना शहरातील नागरिकांच्या सुरक्षेशी आणि सार्वजनिक आरोग्याशी संबंधित हे दोन्ही प्रश्न गंभीर स्वरूपाचे असल्याने महानगरपालिका प्रशासन आणि संबंधित विभाग आता कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. संभाव्य अपघात आणि आरोग्यविषयक धोके टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### मटन-चिकन वेस्टेजमुळे दुर्गंधीचा प्रश्न

दिनकर घेवंदे यांनी निवेदनात आणखी एका गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. रेल्वे स्टेशन ते नूतन वसाहत मार्ग तसेच नूतन वसाहत ते जिल्हाधिकारी कार्यालय मार्गावर असलेल्या काही चिकन आणि मटन विक्रेत्यांकडून कचरा व वेस्टेज रस्त्याच्या कडेला फेकला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कचऱ्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः उन्हाळा आणि पावसाळ्यात या समस्येची तीव्रता वाढत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. उघड्यावर टाकण्यात येणाऱ्या मटन आणि चिकन अवशेषांमुळे भटकी कुत्री, डुकरे आणि इतर प्राणी परिसरात जमा होत असून स्वच्छतेवर परिणाम होत आहे.

# पत्रकारांशी संबंधित घटनांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी

**जालना - प्रतिनिधी**



जालना जिल्ह्यातील पत्रकार राहुल मुळे व पत्रकार संतोष भुतेकर यांच्याशी संबंधित घटनांची सखोल, निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पत्रकार राहुल मुळे व पत्रकार संतोष भुतेकर यांच्याशी संबंधित काही गंभीर घटना घडल्याची माहिती विविध वृत्तमाध्यमे व सामाजिक माध्यमांद्वारे समोर आली आहे. या घटनांमध्ये मारहाण, धमकी, दबाव तसेच पत्रकारितेच्या कार्यात अडथळा निर्माण झाल्याचे आरोप करण्यात आले आहेत. तसेच एका प्रकरणात दिव्यांग व्यक्तीशी संबंधित बाबींचाही उल्लेख करण्यात आला आहे.

या प्रकरणातील संपूर्ण वस्तुस्थिती निष्पक्ष चौकशीद्वारे समोर आणावी, कोणत्याही निरपराध व्यक्तीवर अन्याय होऊ नये तसेच दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर (पान २ वर)

# जालना बसस्थानकातील अस्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर; मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे तक्रार

## शौचालयाचे सांडपाणी बसस्थानक परिसरात वाहिल्याचा आरोप

**जालना । प्रतिनिधी**

जालना मध्यवर्ती बसस्थानक परिसरातील स्वच्छतेच्या प्रश्नाने पुन्हा एकदा गंभीर स्वरूप धारण केले असून, बसस्थानकातील सार्वजनिक शौचालयाच्या सांडपाण्यामुळे प्रवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे जालना शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि बसस्थानक परिसरात कायमस्वरूपी स्वच्छता व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

**दोन दिवस परिसरात सांडपाणी वाहत असल्याचा आरोप**

तय्यब देशमुख यांनी दिलेल्या निवेदनानुसार, दि. ७ जून रोजी जालना बसस्थानकातील सार्वजनिक शौचालयाच्या पाईपलाइनमध्ये अडथळा निर्माण झाल्याने शौचालयातील घाण पाणी बाहेर येऊन परिसरात वाहत होते. ही परिस्थिती केवळ काही तास नव्हे तर ७ जून ते ८ जून दरम्यान कायम असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

या काळात बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली होती. अनेक प्रवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थी यांना या अस्वच्छ परिस्थितीचा त्रास सहन करावा लागला. विशेष म्हणजे, या घाणीमुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

**शौचालयाचे पाईप थेट नदीत सोडल्याचा गंभीर आरोप**

निवेदनात करण्यात आलेला सर्वात गंभीर आरोप म्हणजे (पान २ वर)

# छत्रपती मल्टीस्टेट फसवणूक प्रकरणात आणखी एक संचालक जेरबंद

आर्थिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई; १.३१ कोटींच्या ठेवी घोटाळ्याचा तपास वेगात

**जालना । प्रतिनिधी**

छत्रपती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या कथित आर्थिक फसवणूक प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखा () जालनाने आणखी एका संचालकाला अटक करून तपासाला गती दिली आहे. या प्रकरणात लाखो रुपयांच्या ठेवीदारांची फसवणूक झाल्याचा आरोप असून, आतापर्यंतच्या तपासात १ कोटी ३१ लाख ४४ हजार रुपयांच्या फसवणुकीचे प्राथमिक निष्पन्न झाले आहे.

आर्थिक गुन्हे शाखेकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २८९/२०२५ अन्वये भारतीय दंड संहितेतील कलम ४२०, ४०९, ३४ तसेच एमपीआयडी (पान २ वर)

# सराईत गुन्हेगारांवर पोलिसांचा वॉच; १०० हून अधिक आरोपींची ओळख परेड

## दोनपेक्षा अधिक गुन्हे असलेल्या आरोपींना पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर राहण्याचे आदेश

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जालना पोलिसांनी सराईत गुन्हेगारांविरोधात विशेष प्रतिबंधात्मक मोहीम सुरू केली असून त्याअंतर्गत मंगळवारी (दि. ९) जालना उपविभागातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील दोनपेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या आरोपींची पोलीस अधीक्षक कार्यालयात ओळख परेड घेण्यात आली. या कारवाईमुळे सराईत गुन्हेगारांवर पोलिसांची नजर अधिक तीक्ष्ण होणार असून भविष्यातील गुन्हेगारीला आळा घालण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.



जालना उपविभागांतर्गत येणाऱ्या तालुका पोलीस ठाणे, कदीम जालना, सदर बाजार, चंदनझीरा आणि बदनापूर या पाच पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील एकूण १४० हून अधिक आरोपींना नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार सुमारे १०० आरोपी पोलीस अधीक्षक कार्यालयात हजर झाले. या सर्वांची ओळख परेड घेऊन त्यांची अद्ययावत माहिती संकलित करण्यात आली.

**गुन्हेगारांची माहिती अद्ययावत**

या उपक्रमाद्वारे पोलिसांनी सराईत आरोपींचे सध्याचे (पान २ वर)

# पहिल्याच पावसात मनपा प्रशासनाचा बोजवारा; जालन्यात रस्त्यांवर नाल्यांचे घाण पाणी, नागरिक हैराण

## बसस्थानकासह संग्रामनगर, गांधीनगर, टट्टूपुरा, चंदनझीरा, सुंदरनगर परिसर जलमय; मान्सूनपूर्व कामांच्या दाव्यांची पोलखोल

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात झालेल्या पहिल्याच दमदार पावसाने महानगरपालिका प्रशासनाच्या मान्सूनपूर्व तयारीचे दावे अक्षरशः पाण्यात वाहून गेल्याचे चित्र समोर आले आहे. सोमवारी रात्री झालेल्या पावसानंतर शहरातील अनेक भागांमध्ये नाल्यांचे घाण व दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यांवर आल्याने नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागले.



मध्यवर्ती बसस्थानक परिसरासह संग्रामनगर, गांधीनगर, टट्टूपुरा, चंदनझीरा आणि सुंदरनगर या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली आणि जनजीवनावर परिणाम झाला.

शहरात मान्सूनपूर्व नालेसफाई, पाणी निचरा व्यवस्था आणि स्वच्छता मोहिमेवर लाखो रुपयांचा खर्च केल्याचे दावे महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले होते. मात्र पहिल्याच पावसात अनेक भाग जलमय झाल्याने या कामांच्या गुणवत्तेवर आणि प्रशासनाच्या नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**बसस्थानक परिसरात तलावाचे स्वरूप**

जालना मध्यवर्ती बसस्थानक परिसरात पावसाचे पाणी आणि नाल्यांचे सांडपाणी एकत्र येऊन अक्षरशः तलावासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. बसस्थानकात येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांना पाण्यातून मार्ग काढावा लागला. अनेक ठिकाणी (पान २ वर)

# सखी ग्रुपच्या अध्यक्षपदी डॉ.आरती मंत्री तर सचिवपदी डॉ. अनिता तवरावाला

## नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या जालना सखी ग्रुपच्या सन २०२६-२७ च्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मावळत्या अध्यक्षा सौ. उषा अग्रवाल यांनी नूतन अध्यक्षा डॉ. आरती मंत्री व त्यांच्या कार्यकारिणीकडे औपचारिकरित्या पदभार सुपूर्द केला. नवीन कार्यकारिणीत सचिव डॉ. अनिता तवरावाला, कोषाध्यक्षा प्रतिभा मोतीवाला, सहसचिव दीपाली पाटनी तसेच



सल्लागार म्हणून सरला बागला यांचा समावेश आहे. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व पिन एक्स्चेंज समारंभाने झाली. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना नूतन अध्यक्षा डॉ. आरती मंत्री यांनी आगामी वर्षासाठीचे विविध उपक्रम, महिला सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी आणि सखी समूहाच्या सर्वांगीण प्रगतीसाठीचे संकल्प व्यक्त केले. या प्रसंगी सचिव डॉ. अनिता तवरावाला यांनी वर्ष २०२६-२७ साठीची विशेष संकल्पना (पान २ वर)

# संपादकीय...

## कचऱ्याचा प्रश्न केवळ दुर्गंधीचा नाही, तर सार्वजनिक आरोग्याच्या सुरक्षेचा आहे!

जालना शहरात स्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. त्यातही रेल्वे स्टेशन ते अंबड रोड परिसरात उघड्यावर टाकला जाणारा चिकन आणि मटण कचरा ही चिंतेची बाब बनली आहे. हा विषय केवळ दुर्गंधीपुरता मर्यादित नसून तो थेट सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण आणि शहराच्या नागरी व्यवस्थापनाशी निगडित आहे. सध्या पावसाळा तोंडावर आला आहे. अशा वेळी जैविक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली गेली नाही तर त्याचे परिणाम अत्यंत गंभीर ठरू शकतात. चिकन-मटणचा कचरा काही तासांतच कुजण्यास सुरुवात करतो. त्यातून निर्माण होणारी दुर्गंधी नागरिकांचे जीवन त्रस्त करतेच, शिवाय माशा, डास, उंदीर आणि भटक्या प्राण्यांचे प्रमाण वाढवते. परिणामी डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो, अतिसार आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो.

प्रश्न केवळ विक्रेत्यांचा नाही आणि केवळ प्रशासनाचाही नाही. शहरातील प्रत्येक नागरिक, व्यापारी आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांची या प्रश्नात समान जबाबदारी आहे. व्यवसायातून नफा कमावणाऱ्या मटण आणि चिकन विक्रेत्यांनी कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे हे त्यांचे सामाजिक कर्तव्य आहे. दुसरीकडे महानगरपालिकेने त्यासाठी आवश्यक यंत्रणा, स्वतंत्र संकलन व्यवस्था आणि कठोर अंमलबजावणी उभी करणे गरजेचे आहे.

दुर्दैवाने अनेकदा तक्रारी होतात, निवेदने दिली जातात, फोटो सोशल मीडियावर फिरतात; मात्र प्रत्यक्ष कारवाई होताना दिसत नाही. परिणामी समस्या वर्षानुवर्षे कायम राहते. स्वच्छता विभाग, आरोग्य विभाग आणि अन्न सुरक्षा विभाग यांच्यातील समन्वयाचा अभावही यासाठी कारणीभूत ठरत आहे. आज जालना शहराला गरज आहे ती केवळ कचरा उचलण्याची नाही, तर दीर्घकालीन धोरणाची. चिकन-मटण बाजारांसाठी स्वतंत्र कचरा संकलन केंद्रे, रोजची उचल, जैविक कचऱ्याचे प्रक्रिया केंद्र आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई या उपाययोजना तातडीने राबविण्याची आवश्यकता आहे. शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी केवळ सफाई कर्मचाऱ्यांची नाही. ती प्रत्येक नागरिकाची आहे. मात्र नागरिकांनी जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रशासनानेही आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे बजावली पाहिजेत. अन्यथा पावसाळ्यात कचऱ्याचे ढिग, दुर्गंधी आणि साथीचे रोग यांचा सामना करावा लागेल. आजचा प्रश्न असा आहे की, आपण समस्या वाढण्याची वाट पाहणार आहोत की वेळेवर उपाययोजना करून शहराला स्वच्छ, सुरक्षित आणि निरोगी ठेवणार आहोत? याचे उत्तर प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक या तिघांनीही मिळून द्यावे लागणार आहे.

जालना शहराच्या आरोग्याचा प्रश्न आता दुर्लक्षित करण्याची वेळ निघून गेली आहे. कारण कचऱ्याचा प्रश्न हा फक्त दुर्गंधीचा नसून तो नागरिकांच्या जीवनमानाचा आणि आरोग्य सुरक्षेचा प्रश्न आहे.

### ज्ञानाची शिदोरी सज्ज...!

## भोकरदनला ७३ टक्के पाठ्यपुस्तकांचा पुरवठा



**भोकरदन -प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर भोकरदन तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे.पीएमश्री व समग्र शिक्षा अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत तालुक्यासाठी तब्बल १ लाख ४९ हजार ६०९ पाठ्यपुस्तके प्राप्त झाली असून सुमारे ७३ टक्के पुस्तकांचा पुरवठा पूर्ण झाला आहे.उर्वरित पाठ्यपुस्तकेही लवकरच उपलब्ध होणार असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके यांनी दिली.शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून एकही विद्यार्थी वंचित राहू नये,शाळाबाह्य व गळतीचे प्रमाण शून्यावर आणावे तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांच्या अभावी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, या उद्देशाने शासनामार्फत मोफत पाठ्यपुस्तक योजना राबविण्यात येत आहे.या योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते ८ वीमध्ये शिकणाऱ्या शासकीय,जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच अनुदानित शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके उपलब्ध करून दिली जाणार आहेत. सध्या विभागीय पाठ्यपुस्तक भांडारातून तालुकास्तरावर पुस्तकांची वाहतूक सुरू असून केंद्रस्तर व शाळास्तरावर वितरणाचे नियोजन युद्धपातळीवर करण्यात आले आहे.

**पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके**

नवीन शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना पुस्तकांचा लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे.शाळा सुरू होताच विद्यार्थ्यांच्या हातात पाठ्यपुस्तके देण्याचा प्रयत्न सुरू असून वितरण प्रक्रियेला वेग देण्यात येईल.

**जिल्हा परिषद शाळांकडे पालकांचा वाढता कल**

मोफत पाठ्यपुस्तके,गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विविध शासकीय योजनांचा लाभ लक्षात घेता पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश जिल्हा परिषद शाळांमध्ये करून या सुविधांचा लाभ घ्यावा- *गजानन वाळके (गटशिक्षणाधिकारी भोकरदन)

**पुस्तकांचा पुरवठा वेगात; शिक्षणाचा पाया भक्कम**

भोकरदन तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देणारी ही मोफत पाठ्यपुस्तक योजना यंदाही प्रभावीपणे राबविली जात असून, शाळेच्या पहिल्याच दिवसापासून विद्यार्थ्यांच्या हातात ज्ञानाची शिदोरी पोहोचविण्यासाठी शिक्षण विभाग सज्ज झाला आहे.

# जागतिक नेत्रदान दिन

आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे.

अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी. मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते. नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पान १ वरुन....

## पत्रकारांशी...

कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

पत्रकार हे लोकशाही व्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ असून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करणे आवश्यक आहे. तसेच दिव्यांग व्यक्तींच्या सन्मान व अधिकारांचे रक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी दखल घेऊन सखोल चौकशी करावी तसेच केलेल्या व प्रस्तावित कार्यवाहीबाबत लेखी माहिती द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी केली आहे.

## जालना बसस्थानकातील...

बसस्थानकातील शौचालयाची ड्रेनेज व्यवस्था योग्य प्रकारे नसून संबंधित पाईप थेट नदीपात्राकडे सोडण्यात आल्याचा आहे. पाईप चोकअप झाल्यानंतर संपूर्ण सांडपाणी बसस्थानक परिसरात वाहू लागले, असे देशमुख यांनी म्हटले आहे.

या संदर्भात त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, जर बसस्थानकासारख्या सार्वजनिक ठिकाणी योग्य सेफ्टी टँक किंवा सांडपाणी व्यवस्थापन यंत्रणा नसेल, तर ही अत्यंत गंभीर बाब मानली जावी. या आरोपांची वस्तुस्थिती तपासण्यासाठी स्वतंत्र चौकशीची गरज असल्याची मागणीही त्यांनी केली आहे.

**प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह**

देशमुख यांनी सांगितले की, परिसरातील अस्वच्छतेबाबत त्यांनी जालना आगार प्रमुखांशी दूरध्वनीवर संपर्क साधला. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी रात्री काम करण्याचे सांगितले. त्यानंतर विभागीय नियंत्रकांनाही परिस्थितीची माहिती देण्यात आली.

मात्र, दोन दिवस परिसरात घाण पाणी वाहत असताना संबंधित प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब कशी आली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. बसस्थानकासारख्या गर्दीच्या ठिकाणी नियमित देखरेख आणि स्वच्छता यंत्रणा कार्यरत आहे की नाही, यावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

**स्वच्छतेसाठी घेतले जाणारे शुल्क कुठे जाते?**

राज्य परिवहन महामंडळाकडून प्रत्येक प्रवाशाकडून स्वच्छता शुल्काच्या स्वरूपात दोन रुपये आकारले जातात. या निधीतून बसस्थानक परिसर, सार्वजनिक शौचालये आणि प्रवासी सुविधांची स्वच्छता राखली जाण्याची अपेक्षा असते.

तथापि, जालना बसस्थानकातील प्रत्यक्ष परिस्थिती पाहता या निधीचा वापर नेमका कसा केला जातो, असा प्रश्न देशमुख यांनी उपस्थित केला आहे. राज्यभरातून स्वच्छतेच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा निधी जमा होत असताना बसस्थानकांमध्ये मूलभूत स्वच्छतेचा अभाव का दिसून येतो, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

**प्रवाशांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न**

सांडपाणी, दुर्गंधी आणि अस्वच्छ वातावरणामुळे संसर्गजन्य रोगांचा धोका वाढू शकतो. विशेषतः पावसाळ्याच्या तोंडावर अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होणे चिंताजनक असल्याचे नागरिकांचे मत आहे. बसस्थानक हे दररोज हजारो प्रवाशांच्या वापराचे ठिकाण असल्याने येथे स्वच्छता आणि आरोग्य सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**मुख्यमंत्री, परिवहन मंत्री आणि स्थानिक प्रशासनाकडे दाद**

तय्यब देशमुख यांनी आपली तक्रार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परिवहन मंत्री, जिल्हाधिकारी, महापौर, उपमहापौर तसेच महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे पाठविली आहे. जालना बसस्थानकातील स्वच्छतेच्या प्रश्नाची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.

**चौकशीची मागणी, प्रशासनाकडून प्रतिसादाची प्रतीक्षा**

जालना बसस्थानकातील स्वच्छतेबाबत करण्यात आलेल्या आरोपांमुळे परिवहन विभाग आणि स्थानिक प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निवेदनातील आरोपांबाबत संबंधित विभागाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसली तरी या प्रकरणाची चौकशी होऊन वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

प्रवाशांच्या आरोग्याशी निगडित हा प्रश्न असल्याने प्रशासनाने तातडीने दखल घेऊन स्वच्छता व्यवस्था सुधारावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## छत्रपती मल्टीस्टेट...

() कायद्याच्या कलम ३, ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार आर्थिक गुन्हे शाखा करत आहे. जास्त व्याजाचे आमिष, ठेवीदारांची फसवणूक तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, छत्रपती मल्टीस्टेटचे चेअरमन संतोष बसवंत भंडारी, संचालक मंडळातील सदस्य आणि व्यवस्थापक यांनी नागरिकांना बाजारभावापेक्षा अधिक व्याजदर देण्याचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणावर ठेवी स्वीकारल्या. मात्र मुदत पूर्ण झाल्यानंतरही ठेवीदारांना त्यांचे पैसे परत करण्यात आले नाहीत.

या संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर, बीड आणि जालना जिल्ह्यांमध्ये एकूण २१ शाखा कार्यरत असल्याचे तपासात समोर आले आहे. चेअरमन संतोष भंडारी हे स्वतः ठेवीदारांच्या घरी जाऊन गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहित करत असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. आरोपीचा सक्रिय सहभाग निष्पन्न

या प्रकरणात तपासादरम्यान किरण अरुण तौर (वय ३०, रा. टाकरवण, ता. माजलगाव, जि. बीड) याचा संस्थेच्या व्यवहारांमध्ये सक्रिय सहभाग आढळून आल्याने आर्थिक गुन्हे शाखेने त्याला मंगळवारी (९ जून) अटक केली. आरोपीला बुधवारी (१० जून) न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. अनेक ठेवीदारांच्या तक्रारी

या प्रकरणात अनेक ठेवीदारांनी आर्थिक फसवणुकीच्या तक्रारी दाखल केल्या आहेत. तपास जसजसा पुढे सरकत आहे तसतसे नवीन पुरावे आणि आर्थिक व्यवहार समोर येत असून, फसवणुकीची रक्कम आणखी वाढण्याची शक्यता तपास यंत्रणांकडून वर्तवली जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि प्रभारी पोलीस उपअधीक्षक (आर्थिक गुन्हे शाखा) सुरेश उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, पोलीस उपनिरीक्षक शैलेश म्हस्के तसेच आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

ठेवीदारांना न्याय मिळणार? छत्रपती मल्टीस्टेट प्रकरणामुळे हजारो ठेवीदारांचे पैसे अडकले असून, आर्थिक गुन्हे शाखेची सुरू असलेली कारवाई ठेवीदारांसाठी आशेचा किरण मानली जात आहे. आरोपींवर एमपीआयडी कायद्यान्वये कारवाई होत असल्याने त्यांच्या मालमत्तांवर जप्तीची प्रक्रिया राबवून ठेवीदारांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. तपासाच्या पुढील टप्प्यात आणखी आरोपींची नावे समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## सराईत गुन्हेगारांवर....

वास्तव्य, मोबाईल क्रमांक, व्यवसाय, संपर्क तपशील तसेच त्यांच्या हालचालींबाबतची माहिती अद्ययावत केली. अनेकदा गुन्हेगार ठिकाण बदलतात किंवा संपर्क साधने बदलत असल्याने तपासात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे अशा ओळख परेडीमुळे पोलिसांच्या नोंदी अद्ययावत राहण्यास मदत होते.

पोलिसांच्या मते, या प्रक्रियेमुळे भविष्यात कोणत्याही गुन्ह्याच्या तपासादरम्यान संशयित व्यक्तींचा शोध घेणे अधिक सुलभ होणार आहे. तसेच जिल्ह्यातील सक्रिय गुन्हेगारांवर प्रभावी देखरेख ठेवता येणार आहे.

**आरोपींकडून घेतले बाँड व प्रतिज्ञापत्र**

ओळख परेडीदरम्यान उपस्थित आरोपींकडून भविष्यात कोणताही गुन्हा करणार नाही, कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणार नाही तसेच शांतता भंग होईल असे कोणतेही कृत्य करणार नाही, अशा आशयाचे लेखी बाँड आणि प्रतिज्ञापत्र घेण्यात आले.

पोलिसांनी आरोपींना कायद्याचे पालन करण्याबाबत समुपदेशनही केले. गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर राहण्याचा सल्ला देत पुन्हा गुन्हा केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

**जिल्हाभर राबविणार मोहीम**

यावेळी माध्यमांशी संवाद साधताना अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी सांगितले की, जिल्ह्यात शांतता, सुव्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सराईत गुन्हेगारांच्या ओळख परेडीचे आयोजन करण्यात आले आहे. जालना उपविभागात ही मोहीम यशस्वीपणे पार पडल्यानंतर आता अंबड, परतूर आणि भोकरदन उपविभागांमध्येही अशाच प्रकारची ओळख परेड आणि प्रतिबंधात्मक कारवाई राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**गुन्हेगारी नियंत्रणासाठी प्रभावी पाऊल**

पोलिसांच्या या उपक्रमाकडे केवळ औपचारिक कारवाई म्हणून न पाहता, गुन्हेगारी रोखण्यासाठीच्या दीर्घकालीन धोरणाचा भाग म्हणून पाहिले जात आहे. सराईत गुन्हेगारांना वेळोवेळी पोलिसांसमोर हजर राहण्यास भाग पाडल्याने त्यांच्यावर मानसिक दबाव निर्माण होतो आणि पुन्हा गुन्हे करण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होते, असे कायदा तज्ज्ञांचे मत आहे.

विशेषतः चोरी, मारामारी, जबरी चोरी, दरोडे, अवैध धंदे आणि इतर गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी राहिलेल्या व्यक्तींवर पोलिसांची सतत नजर राहणार असल्याने जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचा पुढाकार**

सध्या वाढत्या शहरीकरणामुळे आणि विविध सामाजिक कारणांमुळे गुन्हेगारीचे स्वरूप बदलत असताना प्रतिबंधात्मक पोलिसिंगची गरज अधिक महत्त्वाची बनली आहे. त्याच पार्श्वभूमीवर जालना पोलिसांनी सुरू केलेली ही मोहीम नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणारी ठरत आहे.

सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवणे, त्यांची माहिती अद्ययावत ठेवणे आणि वेळोवेळी त्यांना पोलिसांसमोर हजर करून जबाबदारीची जाणीव करून देणे, या माध्यमातून जिल्ह्यात गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

## पहिल्याच पावसात...

गुडघाभर पाणी साचल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागला.

कोलू तेल घाना ते बसस्थानक या मुख्य मार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहनचालकांची तारांबळ उडाली. दुचाकी वाहने बंद पडल्याच्या घटना घडल्या, तर काही ठिकाणी नागरिकांना जीव धोक्यात घालून रस्ता पार करावा लागला.

**खोदलेले नाले ठरले डोकेदुखी**

महिनाभरापूर्वी शहरातील विविध भागांमध्ये नालेसफाई व दुरुस्तीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले होते. मात्र ही कामे अपूर्ण राहिल्याने आणि गाळ पूर्णपणे न काढल्याने पावसाचे पाणी नाल्यांमधून वाहून जाण्याऐवजी रस्त्यावर आले. परिणामी अनेक भागांमध्ये जलनिकासी व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र पाहायला मिळाले.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही ठिकाणी नालेसफाई केवळ कागदोपत्री झाल्याचे दिसून येत असून प्रत्यक्षात नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ आणि कचरा साचलेला आहे. याच कारणामुळे पावसाचे पाणी तुंबून रस्ते जलमय झाले.

**घरांमध्ये घुसले घाण पाणी**

चंदनझीरा, सुंदरनगर आणि टट्टूपुरा परिसरातील काही भागांमध्ये नाल्यांचे घाण पाणी थेट नागरिकांच्या घरांमध्ये शिरल्याची माहिती मिळाली आहे. घरातील फर्निचर, इलेक्ट्रॉनिक साहित्य, धान्य आणि अन्य संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सांडपाणी घरात घुसल्याने दुर्गंधी पसरली असून आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. लहान मुले, वृद्ध नागरिक आणि आजारी व्यक्तींना याचा विशेष त्रास होत असल्याची तक्रार रहिवाशांनी केली.

**साथीच्या रोगांचा धोका वाढला**

नाल्यांचे घाण पाणी रस्त्यावर आणि वस्त्यांमध्ये साचल्याने डास, माशा आणि इतर कीटकांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता आहे. परिणामी डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया तसेच जलजन्य रोगांचा धोका वाढला आहे. शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर आधीच प्रश्न उपस्थित होत असताना पावसामुळे ही परिस्थिती अधिक गंभीर बनण्याची भीती आरोग्य क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत.

**नागरिकांचा संताप अनावर**

मान्सूनपूर्व तयारीबाबत अनेक सामाजिक संघटना, नागरिक मंच आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी वारंवार प्रशासनाला निवेदने दिली होती. नालेसफाई, गटारींची दुरुस्ती, अतिक्रमण हटविणे आणि पाणी निचऱ्याच्या उपाययोजनांची मागणी करण्यात आली होती. मात्र या सूचनांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. अनेक नागरिकांनी सामाजिक माध्यमांवर जलमय झालेल्या रस्त्यांचे व्हिडिओ आणि छायाचित्रे शेअर करत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर टीका केली आहे. ''प्रत्येक वर्षी तीच समस्या आणि तीच आश्वासने'' अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

**प्रशासनाच्या दाव्यांची पोलखोल**

महानगरपालिकेकडून दरवर्षी मान्सूनपूर्व तयारीचे दावे केले जातात. नालेसफाई पूर्ण झाल्याचे, जलनिकासी व्यवस्था सक्षम केल्याचे आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज असल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात पहिल्याच पावसात शहरातील प्रमुख भाग जलमय झाल्याने या दाव्यांची पोलखोल झाली आहे.

विशेष म्हणजे, बसस्थानकासारखा मध्यवर्ती आणि संवेदनशील परिसरही पाण्याखाली गेल्याने प्रशासनाच्या नियोजनक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. नागरिकांच्या करातून खर्च होणाऱ्या निधीचा उपयोग नेमका कुठे झाला, असा सवाल आता सर्वसामान्य जालनेकर उपस्थित करत आहेत.

**पुढील पावसाळ्याची चिंता**

हवामान खात्याने यंदा सरासरीपेक्षा चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. अशा परिस्थितीत पहिल्याच पावसात शहराची अवस्था अशी होत असेल, तर पुढील काळात परिस्थिती किती गंभीर होऊ शकते याबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

शहरातील सर्व प्रमुख नाले तातडीने साफ करणे, पाणी निचरा व्यवस्था सक्षम करणे, पावसाचे पाणी साचणाऱ्या ठिकाणांची पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करणे आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

**''पहिल्याच पावसात शहर जलमय, मग मान्सूनपूर्व कामे नेमकी झाली कुठे?''**

जालना शहरातील परिस्थिती पाहता हा प्रश्न आता प्रत्येक नागरिकाच्या मनात निर्माण झाला आहे. पावसाने प्रशासनाला वास्तवाचा आरसा दाखवला असून कागदोपत्री दावे आणि प्रत्यक्ष परिस्थितीतील मोठी दरी पुन्हा एकदा उघड झाली आहे. नागरिकांना दिलासा देण्यासाठी आणि भविष्यातील संभाव्य संकट टाळण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

## सखी ग्रुपच्या...

जाहीर केली. यावर्षी समूहाच्या दहा गटांना भारतातील प्रसिद्ध धार्मिक व प्रेरणादायी तीर्थक्षेत्रांची नावे देण्यात आली असून, त्यामागील आध्यात्मिक मूल्ये, श्रद्धा, सेवा, नेतृत्व, सामूहिकता आणि स्त्रीशक्ती यांचा संदेश सदस्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. डॉ. आरती मंत्री आणि डॉ. अनिता तवरावाला यांनी यापूर्वीही जालना येथील विविध सामाजिक संस्थांमध्ये अध्यक्षपदासह अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. महिलांना सामाजिक कार्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सौ. दक्षा शाह यांनी सन १९९७ मध्ये १४ महिलांना एकत्र आणून सखी ग्रुप या संस्थेची मुहूर्तमेढ रोवलेली आहे. संस्थापक सदस्यांमध्ये सौ. धनकानी, सरला अग्रवाल, कविता झांजरी, सुनीता लुणीया, सुनीता रामचंदानी, संगीता मुंदडा, राजलक्ष्मी नानावटी, दिव्या शाह, मीना शाह, सरला बागला, मनीषा गणात्रा आदींचा समावेश असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या पदग्रहण सोहळ्याला माजी अध्यक्षा, संस्थापक सदस्य, कार्यकारिणी सदस्य तसेच सर्व सखी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. नवीन कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली सखी ग्रुप जालना सामाजिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी क्षेत्रात आणखी उल्लेखनीय कार्य करेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# एमडी ड्रग्स जप्तीची धाडसी कारवाई;

# पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांचा सन्मान

## अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी व डीवायएसपी अनंत कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार; अमली पदार्थांविरोधातील लढ्याला बळ

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात प्रथमच एमडी (मेफेड्रोन) या घातक अमली पदार्थाची जप्ती करून ड्रग्स तस्करांविरोधात धाडसी आणि प्रभावी कारवाई करणाऱ्या कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांचा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे जालना पोलिसांच्या कार्याची जिल्हाभरात चर्चा होत असून अमली पदार्थांविरोधातील लढ्यात पोलिसांना मोठे यश मिळाल्याचे मानले जात आहे.

काही दिवसांपूर्वी कदीम जालना पोलिसांनी रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचून एमडी ड्रग्ससह एका आरोपीला ताब्यात घेतले होते. तपासादरम्यान संबंधित आरोपी हा छत्रपती संभाजीनगर येथील असल्याचे निष्पन्न झाले. जालना शहरात प्रथमच एमडीसारख्या घातक आणि महागड्या अमली पदार्थाची जप्ती झाल्याने ही कारवाई विशेष महत्त्वाची ठरली.

**जिल्ह्यात खळबळ उडवणारी कारवाई**

एमडी अर्थात मेफेड्रोन हा तरुणांमध्ये व्यसनासाठी वापरला जाणारा अत्यंत धोकादायक अमली पदार्थ मानला जातो. राज्यातील अनेक शहरांमध्ये या ड्रग्सचे जाळे विस्तारत असल्याच्या पार्श्वभूमीवर जालना पोलिसांनी केलेली ही कारवाई जिल्ह्यासाठी एक मोठे यश मानली जात आहे. या



कारवाईमुळे केवळ एका आरोपीला अटक करण्यात यश आले नाही, तर जालना शहरात आणि परिसरात ड्रग्स पुरवठ्याचे संभाव्य नेटवर्क उघडकीस आणण्याच्या दृष्टीनेही तपासाला नवी दिशा मिळाली आहे. त्यामुळे ड्रग्स माफियांच्या हालचालींमध्ये खळबळ उडाल्याचे बोलले जात आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून गौरव**

या यशस्वी कारवाईबद्दल पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांचा अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) अनंत कुलकर्णी यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि अभिनंदनपर सत्कार करून गौरव करण्यात आला. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शेवाळे यांच्यासह संपूर्ण पोलीस पथकाच्या धाडसी आणि समन्वयपूर्ण कामगिरीचे कौतुक केले. अमली पदार्थांविरोधातील मोहिम अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्याचे निर्देश देत भविष्यातही अशाच कठोर कारवाया करण्याचे आवाहन करण्यात आले.

**अमली पदार्थांविरोधात पोलिसांची आक्रमक भूमिका**

जालना जिल्ह्यात अलीकडच्या काळात गुन्हेगारीविरोधात विविध विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये अवैध शस्त्रसाठा, मटका, गुटखा, अवैध दारू आणि अमली पदार्थांविरोधातील कारवायांचा समावेश आहे. एमडी ड्रग्स जप्तीची ही कारवाई त्या मोहिमेतील एक महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रकरणातील आरोपीकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ड्रग्स पुरवठ्याच्या साखळीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. जालना शहरात तसेच जिल्ह्यात अमली पदार्थांचे जाळे कितपत विस्तारले आहे, याचा तपास अधिक वेगाने सुरू असल्याचे सांगण्यात आले.

# श्रामनेर संस्कार शिबिर काळाची गरज – महापौर वंदना मगरे

**दत्ता देशमुख**

भारतीय बौद्ध महासभा, जालना यांच्या वतीने तक्षशिला बहुउद्देशीय संस्था संचालित तक्षशिला बुद्ध विहार, समर्थ नगर येथे आयोजित दहा दिवसीय श्रामनेर संस्कार शिबिराचा समारोप उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या महापौर वंदना मगरे यांनी आजच्या मोबाईल युगात अशा प्रकारची संस्कार शिबिरे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. समारोप कार्यक्रमाची सुरुवात श्रामनेर धम्म रॅली व पंचशील ध्वजारोहणाने झाली. ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष (पश्चिम विभाग) राजेश सदावर्ते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तक्षशिला बुद्ध विहाराचे अध्यक्ष भिकाजी साळवे, कोषाध्यक्ष अरुण वाघमारे तसेच भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते. संघनायकांनी उपस्थित उपासक-उपासिकांना त्रिशरण व पंचशील प्रदान केले. महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, नगरसेविका ॲड. रिमाताई खरात, नगरसेवक विनोद रत्नपारखे व केंद्रीय शिक्षक रवींद्र दारोकार यांचे विविध मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक अरुण वाघमारे यांनी केले.

आपल्या भाषणात महापौर वंदना मगरे म्हणाल्या, ''अशा संस्कार शिबिरांमुळे बालकांवर चांगले संस्कार घडतात. हीच मुले उद्याची सुसंस्कृत आणि जबाबदार पिढी घडवतील.'' उपमहापौर राजेश राऊत यांनीही देशाच्या विकासासाठी बालकांचे योग्य संस्कार आणि घडण महत्त्वाची असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात भिक्खू संघाने शिबिरातील अनुभव व मनोगत व्यक्त केले. तक्षशिला बुद्ध विहाराच्या सदस्यांचा भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात आला. समता सैनिक दलाचे कर्नल कुणाल दहिवले यांनी आकर्षक परेड सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. प्रा. डॉ. राजकुमार म्हस्के यांनी उपासक-उपासिकांना भोजनदान दिले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमोद गायकवाड, सुदाम कांबळे, गुमनराव पारखे, राहुल वाकडे, संदीप इंगोले, आकाश शरणागत, महेंद्र साळवे आणि राजेश बगळे यांनी धम्मसेवा दिली. समारोप प्रसंगी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, ॲड. रिमाताई खरात आणि विनोद रत्नपारखे यांच्या हस्ते श्रामनेरांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. त्यानंतर थेरो भदंत शिवली भंते यांनी त्रिशरण-पंचशील देऊन श्रामनेरांना चीवरमुक्त करून उपासक रूपात आणले.

# ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे नळविहिरा येथे मासिक चर्चासत्र उत्साहात संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी, शेतकऱ्यांचे शेतकऱ्यांसाठी स्वयंप्रेरणेने उभारलेल्या ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने दर महिन्याच्या ९ तारखेला आयोजित करण्यात येणारे नियमित मासिक चर्चासत्र मंगळवार दि. ९ जून २०२६ रोजी मौजे नळविहिरा येथील पाटील स्मृती, पाटील कृषी फार्म, दमयंती नगरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात शिवारफेरीने झाली. उपस्थित शेतकरी बांधवांनी फार्मवरील विविध पीकपद्धती, फळबाग, सेंद्रिय शेतीचे प्रयोग, मुलस्थानी जलसंधारणाचे प्रयोग तसेच कमी खर्चातील शेती तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष पाहणी केली. शिवारफेरीदरम्यान शेतकऱ्यांनी आपले अनुभव मांडले तसेच विविध विषयांवर चर्चा केली.

चर्चासत्राची सुरुवात मातृवंदनेने करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे नैसर्गिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी संघाच्या कार्याचा आढावा घेत शेतकऱ्यांमध्ये ज्ञान, संशोधन व अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणण्याचे महत्त्व विशद केले. या



चर्चासत्रासाठी श्री. अमोलजी शिंदे (तालुका कृषी अधिकारी, जाफराबाद), श्री. ज्ञानेश्वरजी इधाटे (विभागीय समन्वयक, पाणी फाउंडेशन) आणि श्री. भगवानरावजी डोंगरे (चेअरमन, आयडियल ॲग्रीटेक प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, सावरगाव हडप) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना श्री. अमोलजी शिंदे यांनी शेतकऱ्यांनी बदलत्या हवामानाचा विचार करून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा तसेच उत्पादन खर्च कमी करण्यासाठी वैज्ञानिक शेती पद्धती स्वीकाराव्यात, असे आवाहन केले. श्री. ज्ञानेश्वरजी इधाटे यांनी जलसंधारण, पाणी व्यवस्थापन आणि सामुदायिक सहभागाचे महत्त्व पटवून दिले. पाण्याचे योग्य नियोजन केल्यास शेती अधिक शाश्वत आणि फायदेशीर होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. श्री. भगवानरावजी डोंगरे यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका, सामूहिक विपणन, मूल्यवर्धन आणि बाजारपेठेतील संधी याविषयी मार्गदर्शन केले. संघटित प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण होऊ शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चर्चासत्रात उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील अनुभव, अडचणी आणि यशोगाथा मांडल्या. विविध पिकांचे व्यवस्थापन, नैसर्गिक शेती, फळबाग लागवड, बाजारपेठेतील बदल आणि शेतकरी संघटन शक्तीची भूमिका या विषयांवर मुक्त चर्चा झाली.

कार्यक्रमास पाणी फाउंडेशनचे क्षेत्रीय अधिकारी श्री. असलम बेग, श्री. किशोर इंगोले, सहाय्यक कृषी अधिकारी श्री. स्वप्नील पाटील, गेवराईचे श्री. अनिकेत तौर, वखारीचे श्री. रामप्रसाद खैरे, दहिगावचे श्री. नंदकिशोर देशमुख, डोलखेडा खुर्दचे श्री. भानुदासराव डोईफोडे, टेंभुर्णीचे श्री. जगन्नाथनाना देशमुख, गोंधनखेडचे श्री. संजय बोऱ्हाडे, नळविहिरा येथील श्री. ज्ञानेश्वर गाडेकर, श्री. हरिष मोरे, डॉ. स्वराज मोरे, श्री. संदेश मोरे, श्री. दिगांबर मोरे, श्री. युवराज मोरे, महादू गाडेकर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला. त्यानंतर उपस्थितांनी वनभोजनाचा आस्वाद घेतला.

''साद तुमची, साथ आमची'' या ब्रीदवाक्याने कार्यरत असलेल्या ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना एकत्र आणून ज्ञान, संशोधन आणि प्रत्यक्ष अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी अशा चर्चासत्रांची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी प्रत्येक जिल्ह्यात सीईटीसेलचे विद्यार्थी सहाय्यता केंद्र विद्यार्थ्यांना अचूक मार्गदर्शन आता जिल्हास्तरावर मिळणार

**मुंबई – प्रतिनिधी**

राज्यातील विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (), शिष्यवृत्ती योजना आणि प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अचूक माहिती व योग्य मार्गदर्शन त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात 'सीईटीसेलचे विद्यार्थी सहाय्यता केंद्र' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज येथे केली.

मंत्रालयात मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात बैठक संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तसेच जिल्हास्तरीय समन्वयक ऑनलाइन उपस्थित होते. बैठकीत सर्व जिल्ह्यातील सीईटी विद्यार्थी सहाय्यता केंद्राचा आढावा घेण्यात आला. मंत्री पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर विश्वासार्ह माहिती, अचूक मार्गदर्शन सहजपणे त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, यासाठी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे सुरू करण्यात आली आहेत, तसेच ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील कामांसाठी वारंवार मोठ्या शहरांमध्ये जाण्याची आवश्यकता भासू नये, त्यांना प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती, विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती व आवश्यक मार्गदर्शन त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, या हेतूने ही केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकूण ४० सीईटी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे सुरू करण्यात येत असून मुंबईत तीन, पुण्यात दोन आणि नागपुरात दोन केंद्रे असतील. यापैकी २६ केंद्रांचे काम पूर्ण झाले असून सहा केंद्रे अंतिम टप्प्यात आहेत. उर्वरित आठ केंद्रेही लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या केंद्रांच्या सेवा १० जून पासून सुरु होणार आहेत, असे यावेळी सांगण्यात आले.

विद्यार्थी सहाय्यता केंद्रचा उद्देशः जिल्हयातील शैक्षणिक संस्था, कक्षाच्या अधिनस्त कार्यरत असलेलेल परीक्षा केंद्र व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा यांच्यात समन्वय व संवाद साधणे. विद्यार्थ्यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील विषय आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संबंधित आवश्यक ती सर्व तांत्रिक व इतर माहिती देणे. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणे, तक्रारीचे निवारण करणे, प्रलंबित तक्रारींचा निपटारा करणे. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी, पात्रता व क्षमतेनुसार योग्य अभ्यासक्रम, पदवी व शैक्षणिक संस्थांची निवड करण्याबाबत मार्गदर्शन करणे. परीक्षा व फेऱ्यांशी संबंधित अभ्यासक्रम, पात्रता निकष, परीक्षा पद्धत, वेळापत्रक आणि अर्ज प्रक्रियेची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे. विविध शिष्यवृत्ती योजना, त्यासाठी पात्रता निकष इत्यांदींबाबत विद्यार्थ्यांना माहिती दणे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर, प्रवेश निश्चितीबाबतचे शंकांचे निराकरण करणे. करिअर मार्गदर्शन व अंदाजात्मक समुपदेशन ( ) प्रदान करणे. पोर्टल व परीक्षा प्रक्रियेशी संबंधित प्रश्नांसाठी विद्यार्थ्यांना फ्रंट डेस्कवर प्रत्यक्ष सहाय्य उपलब्ध करून देणे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक समुपदेशन इंटर्नशिप व रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन करणे. अर्ज भरणे, अर्ज शुल्क भरणा करणे, कागदपत्रे अपलोड करणे, प्रवेशपत्र ( ) संबंधित अडचणी तसेच / फॉर्म मार्गदर्शन यासाठी सहाय्य करणे. तांत्रिक व शुल्कासंबंधीत तक्रारी / शंका (पेमेंट गेटवे समस्या, कागदपत्रे / छायाचित्र /स्वाक्षरी अद्ययावत करणे, दस्तऐवजीकरणातील त्रुटी इ.) आदींचे निराकरण करणे. अशा प्रकारे या केंद्राच्या सेवा दिनांक १० जून २०२६ पासून सुरू होणार आहेत.

# टेंभुर्णीच्या साळवे कुटुंबाचे, सगळ्यात मोठे धोंडे जेवण

**दत्ता देशमुख**



टेंभुर्णी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील साळवे कुटुंब. सध्या अधिक मासानिमित्त धोंडे जेवणाचा कार्यक्रमाची आयोजन करण्यात येत असते. धोंडे जेवण म्हणजे अधिक मासानिमित्त जावयाला देण्यात येणारे गोडधोडाचे जेवण. आता काय बदललेला आहे काळा बरोबर जगलं पाहिजे या भावनेतून टेंभुर्णीच्या साळवे कुटुंबाने आपल्या जावया बरोबरच आपल्या मावस जावयांना तसेच नातेवाईकांच्या जावयांना भावांच्या जावा जावयांना, मित्रमंडळींना, तसेच मुलांच्या मित्रमंडळींना, असा सगळा मोठा धोंडे जेवणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या धोंडे जेवणाला सहकुटुंब सहपरिवार हजेरी लावण्याचे आग्रहाचे निमंत्रण आपल्या तर्फे देण्यात आले होते. त्यांच्या या सहकुटुंब सहपरिवाराच्या मोठे धोंडे जेवण म्हणजेच अधिक मासानिमित्त अन्नदानाचा कार्यक्रम सुद्धा संपन्न झाला. अधिक मासानिमित्त पुण्यपूर्वकाल सुरू असतो. पूर्वपुण्य काळामध्ये धोंडे जेवण एक आनंदाचे वातावरण निर्माण करते. त्याच भावनेतून यासाठी केला होता अट्टाहास अशा आशयाचे वर्णन ज्याचे करता येईल असे हे धोंडे जेवण परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे. धोंडे जेवणाला विशेष उपस्थिती म्हणजे मानव सेवा मंडळाची उपस्थिती होती. त्यांचे तर्फे साळवे कुटुंबांना मोठे गिफ्ट सुद्धा देण्यात आले. अरे कुटुंबातर्फे येणाऱ्या प्रत्येकाला टॉवेल टोपीचा आहेर सुद्धा करण्यात आला.

# पाणीपुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी आय.एम.आय.एस प्रणालीत पूर्ण माहिती भरावी - पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

**मुंबई - प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ विधानसभा मतदारसंघातील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत सहा गावांची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित गावामधील योजनांची कामे पूर्ण क्षमतेने चालू आहेत, तसेच योजनेच्या अंमलबजावणी करण्यासाठी आय.एम.आय.एस (इंटिग्रेटेड मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम) प्रणाली मध्ये पूर्ण माहिती भरावी, असे निर्देश पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

शिरोळ विधानसभा मतदारसंघातील जल जीवन योजनेच्या कामांबाबत मंत्रालयात श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. शिरोळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेंद्र पाटील (यड्रावकर), पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन - नैनुटीया, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव श्रीरंगा नायक, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी प्रशांत भामरे, पुणे येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंत्या वैशाली आवटे, कोल्हापूर येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता डी. के. पाटील, कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अर्जुन गोळे, उपअभियंता एस.एस.लोहार उपस्थित होते. कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन या दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाल्या होत्या.

श्री. पाटील म्हणाले की, शिरोळ विधानसभा मतदारसंघातील १५ नळ पाणीपुरवठा योजना तांत्रिक कारणांमुळे हस्तांतरित झाल्या नाहीत. त्यापैकी एका गावच्या नळ पाणी पुरवठा योजनेअंतर्गत महावितरणचे काम पूर्ण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर करावा. यावेळी जल जीवन मिशन कार्यक्रमातील शिरोळ तालुक्यातील हरोली, नांदणी आणि यड्राव नळपाणी पुरवठा योजनेचा आढावा घेऊन मंत्री पाटील यांनी नवे दानवाड नळ पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव पाठवावा, तसेच लोकप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घ्यावी, असे निर्देश दिले.

# राष्ट्रपतींच्या हस्ते शहीद जवान प्रवीण जंजाळ यांना मरणोत्तर 'कीर्ती चक्र' प्रदान

**नवी दिल्ली -वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे येथील रहिवासी तथा महार रेजिमेंटच्या पहिल्या बटालियन, राष्ट्रीय रायफल्सचे शिपाई प्रवीण प्रभाकर जंजाळ यांना काश्मीर खोऱ्यात दहशतवाद्यांविरुद्ध लढताना दाखविलेल्या अद्वितीय शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाबद्दल मरणोत्तर 'कीर्ती चक्र' प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात आयोजित विशेष 'रक्षा अलंकरण' सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

शहीद जवान प्रवीण जंजाळ यांच्या वतीने त्यांच्या पत्नी श्रीमती श्यामबाला जंजाळ आणि आई श्रीमती शाहू प्रभाकर जंजाळ यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा प्रतिष्ठेचा पुरस्कार स्वीकारला. या सोहळ्यास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, तसेच अन्य केंद्रीय मंत्री, वरिष्ठ लष्करी अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

काश्मीर खोऱ्यात ६ जुलै २०२४ रोजी सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान शिपाई प्रवीण जंजाळ आपल्या तुकडीसह कार्यरत होते. मोहिमेदरम्यान काही संशयास्पद हालचाली निदर्शनास येताच त्यांनी तातडीने आपल्या सहकाऱ्यांना सतर्क केले. याचवेळी लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी पळून जाण्याच्या उद्देशाने अंधाधुंद गोळीबार सुरू केला.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शिपाई जंजाळ यांनी विलक्षण धैर्य, शौर्य आणि प्रसंगावधान दाखवत दहशतवाद्यांचा पाठलाग केला.

स्वतःच्या अचूक गोळीबारातून त्यांनी दोन कुख्यात दहशतवाद्यांचा खात्मा केला. चकमकीदरम्यान त्यांच्या डोक्याला गोळी लागून ते गंभीर जखमी झाले होते. मात्र, गंभीर जखमी अवस्थेतही त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत लढा सुरू ठेवला आणि अखेर मातृभूमीच्या रक्षणासाठी वीरमरण पत्करले. त्यांच्या या अतुलनीय शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेसाठीच्या सर्वोच्च बलिदानाचा गौरव म्हणून भारत सरकारने त्यांना मरणोत्तर 'कीर्ती चक्र' जाहीर केले होते.

# खरा शेतकरी असशील तर फास गळ्याला लावू नको

## मुद्रा साहित्य सेवा संस्थेच्या कवी संमेलनात शब्दांनी दिला जगण्याचा आधार

**जालना । प्रतिनिधी**

''खरा शेतकरी असशील तर फास गळ्याला लावू नको, प्रेमवीर असशील तर मदिरेच्या वाटेला जाऊ नको, बरं नाही यार पिणे विषाचा प्याला,
जग म्हणेल उद्या हरला म्हणून मेला... स्पर्धा कर स्वतःशी, जग तुझ्या मुठीत येईल, वादळाने वाहून गेलं जरी एक पीक, पुन्हा पेरलं की मातीमधून उगून येईल...'' कवी कृष्णा कदम यांच्या या आशावादाने भरलेल्या ओळींनी मुद्रा साहित्य सेवा संस्थेच्या वतीने आयोजित निमंत्रित कवी संमेलनात उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला. जालना येथील विद्युत कॉलनीमध्ये ज्येष्ठ गझलकार सुनील लोणकर यांच्या निवासस्थानी पार



पडलेल्या मृगाच्या स्वागतानिमित्त या काव्यमैफलीत सामाजिक वास्तव, मानवी वेदना, निसर्ग, प्रेम, संघर्ष आणि आशेचे विविध रंग शब्दातून खुलले. कवी कृष्णा कदम यांनी जगण्याला नवी दिशा देणाऱ्या कवितांसह ''वेदना तुझी इतकी खोल यावी, आभाळा तुझी मातीपर्यंत ओल यावी...'' ही रचना सादर करत भेगाळलेल्या भूमीच्या वेदना आणि पावसाच्या प्रतीक्षेतील शेतकऱ्यांचे भावविश्व उभे केले. कवी गणेश खरात यांनी ''अखेर कविता सापडली...'' या कवितेतून भाकरीच्या संघर्षात हरवलेल्या स्वप्नांचा वेध घेतला. ''भाकरीच्या मागे धावताना खूप दमछाक व्हायची माझी...'' या ओळींनी सर्वसामान्यांच्या जगण्याचे वास्तव मांडले. त्यांच्या ''माती म्हणे आभाळाला, थोडं मनातले बोल...'' या कवितेने निसर्गाशी संवाद साधला. कवी दिगंबर दाते यांनी ''पत्ते पिसून झाल्यावर...'' या कवितेतून सुख-दुःखाच्या क्षणभंगुरतेवर भाष्य केले, तर ''आज गडे सये आपण डोळ्यांनीच बोलू...'' या प्रेमभावनेने ओतप्रोत रचनेने रसिकांना भावविश्वात नेले. प्रा. एकनाथ शिंदे यांनी ''कर्जमाफी'' या कवितेतून शेतकऱ्यांच्या आयुष्याचे विदारक वास्तव मांडले. ''खाचा झालेल्या निस्तेज डोळ्यात रंगवतो तो उद्याची भंग पावणारी स्वप्न...'' या ओळींनी उपस्थितांना अंतर्मुख केले. कवी संमेलनाचे अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध मराठी, हिंदी आणि उर्दू कवी मनीष पाटील यांनी ''वेदनेच्या उंबरठ्यावर रेंगणाऱ्या पिलावळी...'' या कवितेतून उपासमार आणि अस्वस्थतेचे चित्र रंगविले. तसेच ''एक ऐसी आवाज...'' या हिंदी रचनेतून मानवी मनातील संघर्षाचे प्रभावी दर्शन घडविले. प्रा. पंढरीनाथ सारके यांनी ''एक चंद्र आहे पण हरवलेला...'' या रचनेतून एकाकीपणाची भावना व्यक्त केली.

# टेंभुर्णी परिसरात शेतकऱ्यांना खरीप हंगाम पेरणीबाबत बांधावर मार्गदर्शन



**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी परिसरातील कुंभारझरी कृषी मंडळात सध्या शेतकऱ्यांना बांधावर जाऊन खरीप पेरणीबाबत कृषी विभागामार्फत मार्गदर्शन केले जात आहे. कुंभारझरीचे कृषी सहायक अधिकारी विजय गायकवाड यांनी सोमवारी कुंभारझरी व परिसरात शेतकऱ्यांना खरीप पेरणीबाबत मार्गदर्शन केले.
यावेळी त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, शंभर मिलिमीटर पाऊस पडल्यानंतरच पेरणी करावी. यावर्षी तापमान अधिक असल्याने शेतकऱ्यांनी धूळपेरणीचा जुगार खेळू नये, असे आवाहनही त्यांनी केले. याशिवाय ज्या शेतकऱ्यांकडे पाणी आहेत त्यांनी ठिबक सिंचनवर कपाशी व सोयाबीनची लागवड करावी, असेही ते म्हणाले. शेतकऱ्यांनी आपल्या स्तरावर खरीप पेरणीचे नियोजन करून त्यानुसार पिकाला द्यावयाच्या खते व औषधी यांचे नियोजन अगोदरच करून ठेवावे, असेही ते म्हणाले. परिसरात यावर्षी अनेक शेतकरी पारंपरिक पिकांसोबत अद्रक व हळद या पिकांनाही विशेष महत्त्व देत आहे. सध्या अनेक शेतातून अद्रक व हळदीची लागवड सुरू आहेत. या पिकांची लागवड व घ्यावयाची काळजी याबाबतही गायकवाड यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांना कुठलीही अडचण आल्यास त्यांनी त्वरित कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहनही गायकवाड यांनी शेतकऱ्यांना केले. करावी.

# 'पीस फाउंडेशन'तर्फे शासकीय कल्याणकारी योजनांवर राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

'पीस फाउंडेशन'तर्फे सोमवार, दि. २५ मे २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी (जालना) येथे राज्यस्तरीय शासकीय कल्याणकारी योजनांविषयी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून, सामाजिक कार्यकर्ते, युवक, समाजप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेचा उद्देश सामाजिक कल्याण, अल्पसंख्याक व वंचित घटक, ग्रामीण उद्योग, शेती, आरोग्य तसेच स्वयंरोजगाराशी संबंधित विविध शासकीय योजनांविषयी जनजागृती करणे हा आहे. विविध विभागांचे तज्ज्ञ व शासकीय अधिकारी योजनांचे लाभ आणि अंमलबजावणी याबाबत सहभागींना मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते होणार असून, कृषिभूषण विजय अण्णा बोराडे आणि अल्पसंख्याक विभागाच्या आयुक्त प्रतिभा इंगळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पीस फाउंडेशन महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. अरशद शेख राहतील. कार्यशाळेत समाजकल्याण विभागाचे अधिकारी राजू एडके, ग्रामीण विकास अधिकारी बी. के. वाघमारे, मौलाना आझाद फायनान्स कॉर्पोरेशनचे व्यवस्थापक एकनाथ कांबळे, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे आर. एन. पवार, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक योगेश सारणीकर, तहसीलदार छाया पवार, अण्णाभाऊ साठे आर्थिक महामंडळाचे उमेश कोल्हे, जिल्हा आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. पंडित वसारे सहभागींना मार्गदर्शन करणार आहेत. मराठवाडा पीस फाउंडेशनचे आयोजक मिर्झा अफसर बेग यांनी समाजातील सर्व घटकांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन शासनाच्या योजनांची माहिती व मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने नेत्र तपासणी व आरोग्य शिबीर संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान गोंदेगाव ता. जि. जालना यांच्या वतीने श्री गणपती नेत्रालय व पीर पिंपळगाव प्रार्थमीक केंद्र यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी व मोफत रक्त आरोग्य तपासणी यासह वृक्षरोपण कार्यक्रम करण्यात आला याप्रसंगी लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान चे अध्यक्ष बद्रीनाथ वाघ यांनी २०१५ या वर्षी प्रतिष्ठान स्थापन झालेल्या संस्थेमार्फत विविध उपक्रम राबवले यामध्ये शालेय साहित्य वाटप, वृक्षरोपण करणे रक्तदान शिबिर आयोजन करणे महिलांसाठी विविध योजना पोहोचविणे,गावामध्ये विविध योजनेचे माहिती प्रसार व प्रचार करणे, कोरोना काळात उल्लेखनीय कामगिरी या प्रतिष्ठानने केली होती.



लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या विचाराचा पाईक बनुन साहेबांनी बहुजनासाठी जे कार्य केले ते कार्य या प्रतिष्ठानचे अध्यक्ष बद्री भाऊ वाघ यांनी चालू केलेले आहे.यापुढेही अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजित या कार्याला विविध क्षेत्रातून उत्कृष्ट असा प्रतिसाद मिळत आहे. आज दिनांक ०६ जून २०२६ रोजी मा.लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान आयोजित नेत्र तपासणी शिबिर व रक्त तपासणी, आरोग्य तपासणी शिबिरास मोठा प्रतिसाद रुग्णाकडून मिळाला. यामध्ये पंचक्रोशीतील गावातील नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला यात जवळपास ३८४ रुग्णांची तपासणी झाली यामध्ये ७३ रुग्णांना मोतीबिंदूचे आजार आढळून आला आणि या रुग्णांना ऑपरेशन साठी हॉस्पिटल कडून मोफत ऑपरेशन सुविधा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.ईतर रुग्णांची सुद्धा चांगल्या पद्धतीने तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत तपासणी झाली याप्रसंगी लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बद्री भाऊ वाघ यांनी सांगितले की, आपण मुंडे साहेबांनी बहुजनांसाठी केलेले कार्याचा आदर्श घेऊन आपणही संस्थेमार्फत गोरगरीब गरजू लोकांना अविरत मदत करत राहू असे सांगितले.

# घरात प्रार्थना सभेसाठी कोणत्याही परवानगीची गरज नाही: छत्तीसगड उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**जालना - प्रतिनिधी**

स्वतःच्या घरात प्रार्थना सभा आयोजित करण्यापासून कोणालाही रोखणारा कोणताही कायदा नाही आणि जर अशी सभा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन न करता आयोजित केली जात असेल, तर त्यासाठी कोणत्याही प्राधिकरणाकडून पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता नाही,'' असा महत्त्वपूर्ण निकाल छत्तीसगड उच्च न्यायालयाने दिला आहे. या निकालामुळे, स्वतःच्या घरात ख्रिश्चन धर्माच्या प्रार्थना सभा आयोजित करण्यापासून रोखणाऱ्या पोलिसांच्या नोटिशीला आव्हान देणाऱ्या दोन व्यक्तींना मोठा दिलासा मिळाला आहे.
न्यायमूर्ती नरेश कुमार चंद्रवंशी यांच्या एकलपीठाने पोलिसांच्या नोटिसा रद्द करत, याचिकाकर्त्यांच्या नागरी हक्कांमध्ये हस्तक्षेप न करण्याचे आणि चौकशीच्या नावाखाली त्यांचा छळ न करण्याचे निर्देश पोलीस प्रशासनाला दिले आहेत. जांजगीर-चंपा जिल्ह्यातील नवागढ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोधना गावात राहणाऱ्या दोन याचिकाकर्त्यांनी ही याचिका दाखल केली होती. ते २०१६ पासून आपल्या घरातील एका हॉलमध्ये ख्रिश्चन धर्मियांच्या प्रार्थना सभांचे आयोजन करत होते.
पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ९४ अन्वये नोटिसा बजावून त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली होती. प्रार्थना सभांमध्ये कोणताही उपद्रव किंवा बेकायदेशीर कृत्य केले जात नसतानाही, पोलिसांनी १८ ऑक्टोबर २०२५, २२ नोव्हेंबर २०२५ आणि १ फेब्रुवारी २०२६ रोजी नोटिसा बजावून त्यांना घरात प्रार्थना सभा घेण्यापासून रोखले होते.
विशेष म्हणजे, यापूर्वी ग्रामपंचायतीने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र देखील दबावाखाली मागे घेण्यात आले होते, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता.
या निकालावर आपली प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशन, जालनाचे अध्यक्ष, ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले, ''छत्तीसगड उच्च न्यायालयाचा हा निर्णय भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या (अनुच्छेद २५) अधिकाराचे संरक्षण करणारा एक मैलाचा दगड आहे.

# रंजनी मदरशात रेल्वे सुरक्षा जनजागृती : उपनिरीक्षक विजय वाघ यांचा विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला

**परतूर - प्रतिनिधी**

रेल्वे प्रवाशांची सुरक्षा आणि रेल्वे मालमत्तेचे संरक्षण या हेतूने रेल्वे पोलिस बल, परतूर आउट पोस्टचे उपनिरीक्षक विजय वाघ यांनी आज रंजनी येथील मदरशातील विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रम घेतला. रंजनी रेल्वे स्टेशनला लागूनच असलेल्या मदरशात हा उपक्रम राबवण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना उपनिरीक्षक विजय वाघ यांनी सांगितले की, ''रेल्वेमध्ये कोणत्याही प्रकारचे ज्वलनशील पदार्थ वाहून नेऊ नयेत.
अशा पदार्थांमुळे रेल्वेला आग लागण्याचा मोठा धोका असतो.



तसेच चालत्या रेल्वेच्या डब्यांवर दगड मारू नयेत, कारण त्यामुळे प्रवाशांचा डोळा जाणे किंवा गंभीर दुखापत होण्याची शक्यता असते.''असे कृत्य करणाऱ्या व्यक्तींवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल होतात आणि त्यामुळे त्यांचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते, अशी कडक समजही त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. ''रेल्वेची सुरक्षा धोक्यात येईल असे कोणतेही कृत्य करू नका,'' असे आवाहन त्यांनी केले.या जनजागृती कार्यक्रमाला हेड कॉन्स्टेबल पी. बी. गायकवाड, कॉन्स्टेबल संदिप जाधव यांच्यासह मदरशाचे प्रिन्सिपल नईम सहाब कसमी, मौलाना मुस्ताकिम, कारी साईब, हाजी शकील आदी मान्यवर उपस्थित होते.

# ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहात प्रवेशाचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

समाजकल्याण विभागामार्फत ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी संबंधित वसतिगृहांशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, जालना यांनी केले आहे.
समाजकल्याण विभागाच्या वतीने ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यात जालना, अंबड, मंठा, बदनापूर आणि घनसावंगी येथे मुलांचे व मुलींचे असे एकूण नऊ शासकीय वसतिगृह कार्यरत आहेत. या सर्व वसतिगृहांची एकत्रित प्रवेश क्षमता ९०० विद्यार्थ्यांची आहे.
या शासकीय वसतिगृहांमध्ये इयत्ता पाचवीपासून ते पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना प्रवेश दिला जातो. प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी निवास व भोजनाची मोफत व्यवस्था करण्यात येते. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली वह्या, पुस्तके, शालेय स्टेशनरी आदी साहित्यही विनामूल्य उपलब्ध करून दिले जाते.
याशिवाय जिल्हास्तरीय वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा ६०० रुपये, तर तालुकास्तरीय वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये निर्वाहभत्ता देण्यात येतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठा आधार मिळणार आहे.
प्रवेशासाठी अर्ज करणारा विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक असून तो ऊसतोड कामगाराचा पाल्य असावा, ही प्रमुख अट आहे. पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी संबंधित वसतिगृहांशी संपर्क साधून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन समाजकल्याण विभागाने केले आहे.
जिल्ह्यातील वसतिगृहांची यादी संत भगवानबाबा मुलींचे शासकीय वसतिगृह, जालना १०० जागा संत भगवानबाबा मुलांचे शासकीय वसतिगृह, जालना १०० जागा संत भगवानबाबा मुलींचे शासकीय वसतिगृह, अंबड १०० जागा संत भगवानबाबा मुलांचे शासकीय वसतिगृह, अंबड १०० जागा संत भगवानबाबा मुलींचे शासकीय वसतिगृह, मंठा १०० जागा संत भगवानबाबा मुलांचे शासकीय वसतिगृह, मंठा १०० जागा संत भगवानबाबा मुलींचे शासकीय वसतिगृह, बदनापूर १०० जागा संत भगवानबाबा मुलांचे शासकीय वसतिगृह, बदनापूर १०० जागा संत भगवानबाबा मुलांचे शासकीय वसतिगृह, घनसावंगी १०० जागा
एकूण प्रवेश क्षमता : ९०० विद्यार्थी
समाजकल्याण विभागाच्या या उपक्रमामुळे ऊसतोड कामगारांच्या मुलांना दर्जेदार शिक्षणासाठी सुरक्षित निवास, भोजन व शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार असून त्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

# बियाणे पाहूनच लागवड करावी – शेती मार्गदर्शक शंकर धनवाई

## टेंभुर्णीच्या बाजारात बियाणे खरेदीसाठी बळीराजाची लगबग



**दत्ता देशमुख**

मान्सून राज्यात दाखल होण्याचे संकेत आणि हवामान तज्ज्ञांच्या अंदाजामुळे टेंभुर्णीच्या सोमवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात शेतकऱ्यांची खरीप पेरणीपूर्व लगबग सुरू झाली आहे. कडधान्य पिकांच्या बियाणे खरेदीसाठी अकोला देव, पापळ, काळेगाव, डावरगाव देवीसह परिसरातील गावांमधून आलेल्या बळीराजाने टेंभुर्णीची बाजारपेठ फुलून गेली होती.

कृषी सेवा केंद्रांपुढे शेतकऱ्यांच्या बैलगाड्या व चारचाकी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. दुकानांमधून बीडीएम-१६९, टीएयु-१ उडीद, चारु तूर अशा वेगवेगळ्या वाणांची विचारणा सुरू होती. हवामान विभागाने व हवामान अभ्यासक पंजाबराव डख आणि तोडतकर यांनी जालना जिल्ह्यासाठी पुढील ४ ते ५ दिवसांत चांगल्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तसेच ८ जूनपासून नक्षत्र बदलून मृग नक्षत्राची सुरुवात झाली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.